## <u>प्र सि द्धी प त्र क</u>

**मानधन तत्वावर "मोडी लिपीतील मजकुराचे मराठीमध्ये लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजीमध्ये अनुवाद" करणाऱ्या मोडी तज्ज्ञ अनुवादकांची नामिका स्थापन करण्याबाबत.**

प्रशासकीय, कायदेविषयक, वैद्यकीय, महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी, इत्यादी अभिलेखांच्या व कागदपत्रांच्या "मोडी मजकुराचे मराठीमध्ये लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजीमध्ये अनुवाद " करणाऱ्या मोडी तज्ज्ञ अनुवादकांची नामिका तयार करावयाची आहे. त्यासाठी मोडी मजकुराचे मराठीत लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजीमध्ये अनुवाद करणाऱ्या मोडी तज्ज्ञांकडून दिनांक १७.०९.२०२५ च्या प्रसिद्धिपत्रकाद्वारे अर्ज मागविण्यात आले होते. तथापि, मोडीतून मराठीत लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजी अनुवाद करण्याबाबत राज्यातून मोठ्या प्रमाणात होणारी मागणी लक्षात घेता, मोठ्या प्रमाणात मोडी तज्ज्ञ अनुवादक उपलब्ध व्हावे आणि अधिकाधिक उमेदवारांना संधी मिळावी यादृष्टीने यापूर्वी मागविण्यात आलेल्या अर्जाच्या अंतिम दिनांकास दिनांक १५.११.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**<u>उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व अनुभव यासह अन्य अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत:-</u>**

१) अनुवादकास प्रशासकीय, कायदेविषयक, वैद्यकीय, महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी, इत्यादी अभिलेखांच्या व कागदपत्रांच्या मोडी मजकुराचे मराठी लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजी भाषेत अनुवाद करण्याचा अनुभव असावा.

२) मोडी तज्ज्ञ अनुवादकास मोडी लिपीचे आणि इंग्रजी व मराठी विषयांचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) ज्या व्यक्तींनी उपरोक्त एक किंवा अनेक विषयांमध्ये स्वत: मोडीतून मराठीत लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजीत अनुवाद करून पुस्तके प्रकाशित केली आहेत अशा व्यक्ती देखील अर्ज करू शकतात.

४) अनुवादकास पुरेसे संगणक ज्ञान आवश्यक आहे. अनुवादकांकडे इंटरनेटसह संगणकाची सुविधा असावी.

५) मोडी लिपीतील ज्ञानासाठी तसेच इंग्रजी व मराठी भाषेतील ज्ञानासाठी शासन मान्यता प्राप्त संस्थेतील किंवा महाविद्यालयातील किंवा विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी/पदवी/अनुवाद पदविका अभ्यासक्रम किंवा पाठ्यक्रम प्रमाणपत्र असलेले उमेदवार देखील यासाठी अर्ज करू शकतात.

६) नामिकेवर घेतलेल्या मोडी तज्ज्ञ अनुवादकांना, शासनाच्या विविध विभाग, मंडळे, महामंडळे यांच्याकडून अनुवादांची कामे परस्पर पाठविण्यात येतील तसेच संबंधित विभाग व कार्यालय आणि मोडी तज्ज्ञ अनुवादक यांच्यामध्ये ठरविण्यात येईल अशा मुदतीत ही कामे विहित मुदतीत पूर्ण करून देणे ही नामिकेतील मोडी तज्ज्ञ अनुवादकांची जबाबदारी असेल.

७) नामिकेतील मोडी तज्ज्ञ अनुवादकांनी अनुवादाचे काम समाधानकारक पूर्ण करून दिल्यावर, शासन वेळोवेळी निश्चित करील त्या दरानुसार काम देणाऱ्या विभागाकडून किंवा कार्यालयाकडून किंवा संस्थेकडून अशा अनुवादकांना मानधन प्रदान करण्यात येईल.

८) मोडी तज्ज्ञ अनुवादकाने अनुवादित केलेल्या अनुवादाच्या अचूकतेची व अर्थपूर्णतेची जाबाबदारी सर्वस्वी संबंधित अनुवादकाची राहील.

९) मोडी अनुवादकांनी, त्यांच्या कामाचा सहामाही अहवाल अनुक्रमे, दरवर्षी १५ जुलै व १५ जानेवारीपर्यंत विहित नमुन्यात या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक राहील.

१०) मोडी लिपीतील मजकुराच्या लिप्यंतराच्या व अनुवादाच्या कामातील अचूकता, कार्यक्षमता व कार्यतत्परता याचा आढावा घेऊन नामिकेतील मोडी तज्ज्ञ अनुवादकांना वगळण्याचा तसेच नवीन मोडी तज्ज्ञ अनुवादकांचा नामिकेत समावेश करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

११) यापूर्वी दिनांक १७.०९.२०२५ च्या प्रसिद्धीपत्रकानुसार अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच त्यांना देखील या प्रसिद्धीपत्रकातील अटी व शर्ती लागू राहतील.

तरी इच्छूक मोडी तज्ज्ञ अनुवादकांनी आपले अर्ज मूळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह भाषा संचालनालय, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ या पत्त्यावर दिनांक १५.११.२०२५ पर्यंत पाठवावेत.

**भाषा संचालक,**
**महाराष्ट्र राज्य.**